REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# दलित जाणिवेची कविता : वर्तमानाच्या अंतर्बाह्य स्वरूपावर प्रकाशझोत

डॉ. राजाराम राठोड
मराठी विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर.

## प्रस्तावना

आपण प्रश्न विचारतो. कविता म्हणजे काय ? कविता म्हणजे आपले रोजचे जगणे असते. आपण वृक्ष पाहतो. वृक्ष एक कविता असते. आपण सुंदर डोळे पाहतो. ते डोळे एक कविता असते. आपले आयुष्य म्हणजे कविता असते. आपण एखादे पुस्तक वाचून समृद्ध झालो असे म्हणतो, हे म्हणणे कविता असते. ही समृद्धता अनुभवण्याचा भाग आहे. व्यवहारात समृद्धी म्हणजे पैशाची जमापुंजी हे गद्यात येते. आपण सर्वच जन कविता करत असतो. ती कधी आपल्या बोलण्यातून, विचार करण्यातून व्यक्त होते तर कधी मानसिक पातळीवर घडत असते. कवी या सर्व बाबींना शब्दात पकडतो, शब्दांचा क्रम लावून त्याला अर्थवत्ता आणि कविता साकारते. हे साकारणे सर्वांच्या बाबतीत घडत नाही. असे म्हटले जाते की, रसिक हा मुका कवी असतो, तर कवी हा बोलका रसिक असतो. प्रकाश, उजेड सर्वांना माहित असतो पण ते नेमकेपणाने आपण सांगू शकत नाही. तसेच कवितेचे आहे. असे असले तरी कवितेबद्दल केलेले विधान अथवा व्याख्या कवितेचे संपूर्ण रूप प्रकट करू शकत नाही. कवितेला कितीही शब्दात बांधले तरी ती शिल्लक राहतेच. तिचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आपण तिची तुलना करतो, तिचे विशेष सांगतो. कवितेत काय येत नाही हे सांगतो. तिच्या रचनेबद्दल बोलतो. हे सर्व खरे असले तरी अंतिम विधान करता येत नाही. गद्य आणि पद्य याची तुलना करताना फ्रेंच कवी Paul Valery म्हणतो, 'Prose is walking and Poetry is dancing'[१] सौंदर्याचे कलात्मक रूप कवितेतून प्रतिबिंबित व्हावे. कविता ही नाद, लयींनीयुक्त रचना असते. कविता ही पुर्णत्वापेक्षा अपूर्णतेकडे झुकलेली असते. उत्कट भावनेचा उत्स्फूर्त उद्रेक म्हणजे काव्य अशी कवितेची व्याख्या वर्डस्वर्थ यांनी केली आहे. कविता या शब्दाबाबत कुतूहल दिसून येते. कवितेचा अर्थ अनेकांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. भामह यांनी शब्द आणि अर्थ याचे महत्त्व सांगितले आहे तर शब्दाची चमत्कृतिपूर्ण बांधीव रचना म्हणजे काव्य असे कुन्तक यांचे मत आहे. अशा रचनेतून रसिकांना आल्हाद प्राप्त झाला पाहिजे. कवितेत अलंकारांनीयुक्त शब्द असावेत असे मम्मट यांचे प्रतिपादन आहे. जगन्नाथ पंडितांच्या मते रमणीय अर्थाला कवितेत महत्त्व आहे. कवितेसाठी इंग्रजीतील Poetry हा शब्द आहे. Poiesis या ग्रीक शब्दापासून पोएट्री हा शब्द आला आहे.[२] त्याचा अर्थ रचना, विन्यास असा होतो. कला–सर्जन असा ही अर्थ होतो. कविता म्हणजे एक कलात्मक कृती अस्तित्वात आणणे जी अगोदर अस्तित्वात नव्हती.



## दलित जाणिवेची कविता : वर्तमानाच्या अंतर्बाह्य स्वरूपावर प्रकाशझोत

वेदना, आत्मशोध, नकार आणि विद्रोह हे घटक दलित जाणीव व्यक्त करतात. अन्यायाची चिकित्सा आणि न्यायाची मागणी हा या कवितेचा प्राण आहे. त्यासाठी विद्रोह करून विषमतेला नकार देण्याची भाषा कविता करते.

'आत्ता' या नामदेव ढासळ यांच्या कवितेत अंधाराबरोबर चालण्यास नकार दिला आहे. अन्यायकारक व विषम परंपरांना मूठमाती देऊन समतेच्या वाटेने सन्मानपूर्वक चालण्याची जाणीव 'आत्ता सूर्यफुलासारखे सुर्योन्मुख झालेच पाहिजे' या ओळीतून दिसून येते.

त्र्यंबक सपकाळे यांची 'स्वागत' कविता विषमतेचा धिक्कार करते. आंबेडकरी कवी कवितेचा वापर शस्त्रासारखा करतो. बुरसटलेल्या विचारांवर तो प्रहार करतो. येथील संस्कृतीने चातुर्वर्ण्य, धर्मांधता, जातीयता, विषमता, रंग भेद करून माणसा माणसात दरी निर्माण केली. पशु–पक्षांना पाणवठे खुले पण माणसांना नाही. ही वेदना सपकाळे यांनी उपरोधिकपणे 'स्वागत' कवितेतून मांडली आहे.

विषमता नैसर्गिक नाही ती रचली गेली. स्वार्थ, हाव यामुळे व्यापारी वृत्तीने हिणकस रूप धारण केले. भांडवलशहा लोकांनी युती करून नफ्याचे क्षेत्र काबीज केले. नफा कमावण्यासाठी निसर्ग संपदेची अतोनात नासधूस केली. पाणी, माती, आकाश, अंतराळ यावर मालकी सांगण्यात येत आहे. पण यातून प्रश्न निर्माण होत आहेत. पाणी प्रश्नाची वासलात अशीच लागत आहे. यावर 'युनोत पाणी' कवितेतून भुजंग मेश्राम(कवितासंग्रह 'अभुज माड') यांनी भाष्य केले आहे. पुरुषसूक्त रचून येथील व्यवस्थेने सत्य लपवून ठेवले. अमृतमंथनाच्या कथा रचल्या. स्वार्थलोलुपता विषमता रचण्यास लबाडी करू लागली. पण ही अघोरी भूक कमी झाली नाही. पाणीप्रश्न भयावह होत आहे. पर्यावरणाचे मोठे संकट असून ते आपल्याला जाणवत नाही. ग्रेटा थूनबर्ग हिचा उद्वेग यातूनच दिसून येतो. समकालीन जागतिक वास्तवाची जाण त्यांच्या कवितेतून दिसून येते. पाणी प्रश्न जागतिक पातळीवर भेडसावत आहे. पर्यावरणीय समतोल ढासळत आहे. यावर उपाययोजना करण्यात जागतिक स्तरावर अपयश येत आहे. पाणी हा पर्यावरणातील घटक घेऊन भुजंग मेश्राम यांनी भाष्य केले आहे. भुजंग मेश्राम यांच्या कविता या आदिवासी जाणीवेच्या कविता आहेत. पण प्रस्तुत कवितेत पृथ्वीवरील नैसर्गिक साधन संपदेपैकी पाणी आणि त्याच्याशी संबंधित राजकारण आणि त्याचे अपयश उपरोधिक शैलीत व्यक्त झाले आहे.

लोकनाथ यशवंतांची कविता जनसामान्यांची आहे. नागड्या व्यवस्थेचा आरसा ती सहजपणे, स्पष्ट दाखवून देते. म्हणून सगळ्या शोषितांची होऊन जाते. स्त्री ही शोषित राहिली आहे. त्यांच्या कवितेतून पुरुषी वर्चस्वाखालील स्त्रीच्या स्वत्वाची घुसमट ध्वनित होते. 'नफिसा' कवितेत स्त्री ही जुनाट परंपरांचा, स्त्री–पुरुष विषमतेचा त्याग करीत असल्याबाबत समाधान व्यक्त केले आहे. पण ही वाट खडतर असल्याची जाणीव कवितेतून होते. येथील जुन्या परंपरा, कथा तिची पाठ सोडत नाहीत. म्हणून कोठल्याही तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवू नको असे बजावले आहे. कारण

> 'ते तत्त्वज्ञान फक्त सांगण्यासाठीच असते
> तिथला प्रत्येक माणूस हा आपापल्या सोयीनुसार
> आपापले तत्त्वज्ञान करून जगत असतो'
> धर्माच्या ठेकेदारापासून सावध रहा.
>
> इथल्या प्रमाणेच तिथेही दोन प्रकारच्या दातांचा व्यवहार असतो'

समाजात स्त्रीला माता, देवी असे म्हणून सर्वोच्च स्थान बहाल केले आहे. पण प्रत्यक्षातला व्यवहार वेगळा असतो. तिला नेहमी दुय्यमत्व दिले जाते. म्हणून समतेच्या बोधीवृक्षाखाली थांबण्यास सांगितले आहे.

शशिकांत हिंगोणेकर यांनी 'आसक्तीच्या मनाला' कवितेतून मानवी दुःख व त्या अनुषंगाने चिंतन केले आहे. दुःख हे का दूर होत नाही आणि ते दूर करायचे असेल तर गौतम बुद्धाची शिकवण अंगिकारली पाहिजे.

> 'कशामुळे येते
> हे दुःख वाट्याला
> आणि का सामोरे जावे लागते
> दुःखाला ?'

दुःख दूर करण्यासाठी तृष्णामुक्त होणे गरजेचे असते, असे कवी सांगतो. तूच तुझ्या जीवनाचा मार्गदाता हो म्हणजे दुःखाला दूर करता येईल. समतामूलक समाजाची निर्मिती यातून होईल हा आशावाद दिसतो. शशिकांत हिंगोणेकर हे अंतर्मुख प्रवृत्तीचे कवी आहेत. मिताक्षरी भाषा आणि अभिव्यक्तीतील सारल्य हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य चटकन नजरेत भरतात.[३]

कविता प्रश्न विचारते म्हणून व्यवस्थेला कवितेची भीती वाटत आली आहे. दलित कवितेने येथील व्यवस्थेची चिकित्सा केली. येथील अन्याय व्यवस्थेला वेशीवर टांगले. विषमतेला नकार दिला. ढोंगीपणावर प्रहर केला. भगवान ठाकूर यांनी 'वासनाकांड' कवितेतून गरीब श्रीमंतातील दरी स्पष्ट केली आहे. झोपडपट्टीत राहणारे आणि हवेल्यात राहणारे या विषमतेतून कसे वासनाकांड घडत आहे याची जाणीव त्यांच्या कवितेतून होते.

'या तुमच्या उच्चभ्रू संस्कृतीत
गुदमरताहेत मात्र, पलीकडील झोपड्या ...'

विषमतेच्या चिखलात अनेक समूह बरबाद होत आहे. गरिबी, भूक यांचा फायदा घेऊन येथे वासनाकांड घडत आहेत याची नोंद प्रस्तुत कविता घेते.

दलित साहित्यात भूक आणि त्यासंबंधीची वेदना सातत्याने आली आहे. ही भूक क्रांतीची सुरुवात करेल असे महमद शकील जाफरी यांनी 'सुरुवात' कवितेत केली आहे. या भुकेत

'त्या अग्नी ज्वालात
शास्त्र आणि धर्मही
जळून राख होतात'
.......................
भुकेने
आक्रमण केल्यावर
चतकोर भाकरी ही
क्रांतीची
सुरुवात करेल'

या क्रांतीसाठी प्रत्येक भुकेली व्यक्ती महान योद्ध होईल. असे भाष्य कवी करतो.

अरुण काळे यांची कविता म्हणजे दलित कवितेचा सशक्त आवाज होय. मुख्य प्रवाहातील मराठी कवितेला समाजाभिमुख करणारी दलित कविता त्यांनी लिहिली. आम जनतेची खास भाषा बोलत अरुण काळे यांनी आपल्या कवितेतून समाजलक्ष्यी चिंतन साकारलेले आहे. दलित कवितेने येथील विषम व्यवस्थेचे ऑडीट केले आहे. विषमतेची मुळे धर्मव्यवस्थेत असल्याने त्याची कठोर चिकित्सा दलित कवितेत आली आहे. 'दारासमोरचे देव' कवितेतून बाप मुलाच्या संवादातून येथील व्यवस्थेची तर्कशुद्ध चिरफाड केली आहे. येथील सामान्य लोकांचा इतिहास न लिहिल्याने मोठी हानी झाली आहे. या इतिहासाच्या खुणा दगडी चिऱ्यात दिसतात. या दगडी चिऱ्यात कोरलेल्या मूर्तीचा अर्थ मुलगा विचारतो.

'मी बापाला विचारलं, 'आपण गावाबाहेर
अन हे देव म्हणजे काय ?
तर तो म्हणाला, 'अरे हा आपला इत्यास हाये'

गत इतिहास हा मानवतेच्या समृद्धीचा होता. हा काळ बुद्धकाळ होता. हे समजते. पण त्याची पीछेहाट झाल्यावर इथे विषमतामूलक समाज जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आला. समतेचे पिंपळ झाड कोसळले.

'पूर्वी ह्या लोकांच्या म्हणजे मूर्त्यांच्या सावलीसाठी
एक मोठा पिंपळ होता, तो वादळात पडल्यावर
.........
कुणालाही एवढा मोठा पिंपळ परत लावता आला नाही'

त्यानंतर अस्पृश्यता लादण्यात आली. शिक्षण बंदी लादण्यात आली. धन संपती बाळगण्याचा अधिकार हिरावून घेतला. म्हणजे मुळचे हे लोक अस्पृश्य नव्हते. ते मृत मांस खात नव्हते. ते लढवय्ये होते. धोकेबाजीमुळे ते गुलामीत गेले. या धोकेबाजीने भारताला गुलामीत ठेवले आहे. कवी पुढे नागवंशीय राजे यांच्याशी आजचा अस्पृश्य संबंधित असल्याचे सांगतो. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे बौद्ध धम्म स्वीकारल्याचे सांगतो. पण येथील ढोंगी व्यवस्थेने साप कसे ठरवले ते काय सांगता यायचे नाही असे कवी सांगतो. पण वाचकाला याचे कारण अपोआप कळत जाते. स्त्रियांना कमी लेखने हा सुद्धा या विषमता मूलक व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे. आधी स्त्री–पुरुष समता होती. पण ही विषमता केंव्हापासून आली ते सांगता यायचे नाही. यातील सूचकता महत्त्वाची आहे. या कवितेतील 'तं धोकेबाजीनं आपल्यालाच नाही तर इंडियालाबी गुलामीत ऱ्हायला लागलं', 'आज ते पाय असते तर बाटाच्या पाच नंबर लेडीज चप्पलला बसले असते' असे वर्तमान संदर्भ कवितेला अर्थवत्ता प्रदान करतात. 'ग्लोबलचं गावकूस' कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत अरुण काळे म्हणतात, 'केवळ जन्मामुळे वाट्याला येणाऱ्या उपेक्षामागची कारणं नष्ट व्हावीत असं जगताना वाटतं, तसंचं माझ्या कवितेलाही वाटतं.'त्याप्रमाणे या कवितेचा आशय आहे.

दलित साहित्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे. कारण येथल्या अमानुष व्यवस्थेने माणसाचे माणूसपण हिरावून घेतले. नसलेल्या बाराभानगडी सांगून एका समूहाला गुलामीत ठेवले. अज्ञानाच्या खाईत लोटले. पण फुले, शाहू, आंबेडकर यांनी या खाईतून बाहेर येण्याचा मार्ग दाखवला. हा मार्ग खडतर होता. येथील प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान द्यायचे होते. ते या महामानवांनी दिले. आणि येथील गुलामांना जोखडातून मुक्त केले. पण प्रस्थापित व्यवस्था आपले रूप बदलून आपला स्वभाव बदलण्यास तयार नाही. अशा व्यवस्थेला ठीक करण्याचा मार्ग आणि शिका–संघटीत व्हा–संघर्ष करा हा मंत्र दिला. चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून याची सुरुवात झाली. अशा सर्व परिवर्तन घडवून आणणाऱ्या घटनांचे संदर्भ दलित कवितेतून प्रायः येतात. 'आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून' ही सिद्धार्थ तांबे यांची कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरप्रणीत आदर्श राज्य व समाजव्यवस्थेचा पुरस्कार करते. याच्या विरोधात जे जे येते ते बदलून सम्यक समाजव्यवस्थेला बळकट करण्यासाठी संवाद साधते. 'आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून' या कवितासंग्रहाला मोतीराम कटारे यांनी पाठराखण लिहिली आहे. त्यात त्यांनी या कवितेचा सार सांगितला आहे. 'आयडियल स्टेट' ही मूळ प्लेटोची संकल्पना आहे. कवींनी विवेक, शौर्य, संयम आणि न्याय या सदगुणांचा परिपोष करणारे लेखन केले पाहिजे असा त्याचा आग्रह होता. जे असे लेखन करणार नाहीत त्यांना आदर्श राज्यात स्थान असणार नाही. याउलट स्थिती येथे आहे. हे सदगुण ज्यांच्याकडे होते त्यांना 'मनू'प्रणीत व्यवस्थेने बहिष्कृत केले, शुद्र ठरवले. या वर्गाचा प्रतिनिधी असल्याची जाणीव 'आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून' ही कविता देते. 'मनू'प्रणीत आदर्श राज्यात नैतिकतेला वाव नाही म्हणून धर्मव्यवस्थेने लादलेल्या संकल्पना आणि विचारव्यूहांवर प्रहार, त्यातील मिथकांना उद्ध्वस्त करण्याचे काम कवीला करावे लागते. असे काम महात्मा चक्रधर, संत तुकाराम आणि बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. महात्मा चक्रधर यांनी माणुसकीला साद घातली. पण

'अखेर तीही नामशेष उत्तरपंथे
तिचा दोष इतकाच तिने माणुसकीला
नरकातून बाहेर यायला साद घातली'

नंतर सामाजिक दंभावर प्रहार करण्याचे कार्य संत तुकाराम यांनी केले. पण

'नादानांनी तेंव्हा बुडवले
सतरावे शतक अर्थासह आनंद डोहात'

त्यानंतर डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी ही नाव पुढे नेल्याचे कवी सांगतो. अठराशे एक्याण्णव यातून हे स्पष्ट होते. त्यांनी

'रोखल्या बांधला
नख लावून त्याने
तुंबलेले पाणी ओंजळीत घेतले
आणि अवघे जीवन चवदार झाले'

सिद्धार्थ तांबे यांनी प्रस्तुत कवितेतून परिवर्तनाचे महत्त्वाचे टप्पे सूचकपणे सांगितले आहेत.

विद्रोह हा दलित साहित्याचा किंबहुना दलित कवितेतील महत्त्वाचा घटक होय. विद्रोह म्हणजे द्रोहाविरुद्ध सनदशीर आंदोलन. 'सामर्ग्याचं उन्नयन या उदात्त हेतूनं विशिष्टांच्या अनिर्बंध शोषणाला व शोषणाच्या सामग्रीला सर्वंकष नकार म्हणजे विद्रोह.'[४] या सामार्ग्याच्या उन्नयनात स्त्री सुद्धा आहे. नागराज मंजुळे स्त्री शक्तीला तिच्या शोषणाविरुद्ध बंड करण्याचे आवाहन करतात. ते 'उन्हाच्या कटाविरुद्ध' कवितेतून. कवी म्हणतो या सनातनी उन्हाला तू घाबरू नकोस. हे ऊन बाहेरख्याली आहे. त्यासाठी स्वतःला बंदिस्त करू नकोस. त्यांच्यासाठी

'तू का होते आहेस
एका सुरक्षित खिडकीतील
शोभिवंत बोन्साय
अन लाचारपणे
मागतेयस सावली'

स्वतःची नैसर्गिक वाढ होऊ दे. माणूस म्हणून तू जग. कारण स्त्री ही जन्माला येत नसून ती घडवली जाते. या घडवण्याला नकार दे.

'का तू
उन्हाच्या कटाविरुद्ध
गुलमोहरासारखं
त्वेषानं फुलत नाहीस'

प्रखर ऊन म्हणजे येथील पुरुषसत्ताक व्यवस्था होय. यात होरपळण्यापेक्षा नेसर्गिकरितीने गुलमोहरासारखं वाढावं ही कवीची अपेक्षा आहे.

कवी अविनाश गायकवाड त्याच्या सर्वच कवितांमधून जे काही वक्तव्य करतो, त्याचा आशय देशातील संपूर्ण सामाजिक, राजकीय, परिदृश्याला सामावून व्यक्त झालेला दिसतो. समग्र जीवनभान गायकवाड यांच्या कवितेत व्यक्त होतो.५ त्यांनी 'सिरीयलवाला ऑनलाईन' युट्यूब चॅनलवर अविनाश बरोबर कवितेच्या जगात... ही वेबसिरीज सुरु केली असून आतापर्यंत ३८ भाग प्रसारित झाले आहेत. यात बहुतांश प्रसिद्ध कवीच्या कविता या चॅनलवर पाहायला मिळतात. अविनाश गायकवाड यांचा 'खिंडीत गोठलेलं सुख' हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या 'मातीचं भंड पडो' या कवितेतून दलित जाणीव प्रबळ रीतीने आली आहे. आंबेडकरी विचार रुजून बराच काळ लोटला. पण संपूर्ण परिवर्तन घडून येत नाही. सामाजिक परिवर्तनाच्या संथगतीची कवीला चीड येते. कवी अस्वस्थ होतो. चळवळीचे बळ क्षीण होत असल्याची खंत कवी व्यक्त करतो. हे बळ चवदार तळ्याच्या सत्याग्रहातून मिळालं होतं.

'कुठं गेलं चवदार तळ्यानं केलं उर्जित
या तमाम माणसातलं
बारा हत्तीचं बळ'

हे बळ पुन्हा प्राप्त व्हावं असेच कवीला वाटते. काळोखाच्या बेड्या तोडणारा विचार पुन्हा फुलवा. समाजाला जागृत करावे.

वाहरू सोनवणे यांची कविता दलितांच्या व्यथा, वेदना मांडते. जातव्यवस्थेतील उतरंड आणि त्यातील कनिष्ठ स्थान हे वेदनादायी असून समान स्थानाची मागणी 'स्टेज' कवितेतून करण्यात आली आहे. ते आणि आम्ही यातील दरी नष्ट होऊन आपण होऊ या. पण येथील वर्णव्यवस्था आणि जातव्यवस्था माणसाला कप्पेबंद करते. हा भेदभाव समाजात कसा रुजला आहे याचे चित्रण सोनवणे यांची कविता करते.

'आम्ही स्टेजवर गेलोच नाही
आणि आम्हाला बोलावलंही नाही
बोटाच्या इशाऱ्यांनी
आमची पायरी आम्हाला दाखवून दिली
आम्ही तिथेच बसलो
आम्हाला शाबासकी मिळाली'

येथील व्यवस्था ही अशी आहे. शंका कुजबुजल्यावर येथे कान पकडले जाते. हे स्टेज आम्हाला कधी मिळणार. किती दिवस थांबायचे. ते मिळवले पाहिजे. असे ही कविता सुचवते.

मोहन शिरसाट यांचा 'नाही फिरलो माघारी' हा कवितासंग्रह ग्रंथाली प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. यातील शीर्षक कविता ही घावांच्या व्रणांची वेदना सांगणारी आहे. जगण्यातल्या उपेक्षेला सोबत घेऊन पुढेच चालत गेलो असे कवी सांगतो. या उपेक्षेबाबत कवी म्हणतो,

'मिळणाऱ्या वाट्याला
झीरोने गुणलेले
मायनस मायनस गटातल्या
प्रतलातले जिणे'

नवी शब्दकळा अंगीकारून हा कवी स्वतःला सामर्थ्याने व्यक्त करतो. आनंद विंगकर त्यांच्या कवितेचे परीक्षण करताना म्हणतात, 'दलित साहित्यातील विद्रोह आणि नकार यापलीकडे जाऊन किमान एकसंवादी सूर निर्माण करता येईल का, याचा खोलवर विचार करून प्रस्तुत संग्रहात आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न शिरसाटांनी केला आहे. संग्रहातल्या सुरुवातीच्या कविता दीर्घ स्वगतांसारख्या, त्यातही वाचन, चिंतन आणि अनुभवाच्या ऊर्ध्वपतनांतून आकाराला आलेली सुरुवातीची ही कविता परत परत वाचल्याशिवाय फारशी समजत नाही. अंदमान निकोबार बेटातील एकाद्या प्रागैतिहासिक जनसमूहातील टिकून राहण्याची क्षमता पूर्वापार वंचनेतच जगणाऱ्या आदिवासीमधेच दिसून येते. म्हणूनच 'नाही फिरलो माघारी'या कवितेत मोहन शिरसाट म्हणतात, 'हे दबलेले श्वास अधिक दाबून राहिलेले, वायनांची चाळणी, पायांची गाळणी, चिंध्यांचे काळीज अथंरलेले, घावांच्या व्रणांचे कवच नेसताना, नाही फिरलो माघारी.'[६]

दंगलीवर आणि त्यातील हिंस्रतेवर प्रकाश टाकणारी 'बेसावध' ही कविता आहे. त्याचे कवी आहेत शेषराव पिराजी धांडे. जातीय दंगली तर सामाजिक एकोप्यात विष कलवण्याचे काम करतात. महाराष्ट्राने याच्या कळा वारंवार सोसल्या आहेत. सामाजिक ताणेबाणे यामुळे कायमचे विस्कळीत होतात. दंगलीमुळे सर्वात जास्त प्रभावित होतो तो मजूर वर्ग. त्यामुळे अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे अफवांना भिक न घालता जातीय अस्मितेच्या पलीकडे जावून मानवतेचा पुरस्कार सर्वांनी करावा अशी अपेक्षा कवीची आहे. त्यासाठी निरंतर सावध असणे गरजेचे आहे. संदेशाचे हेतू समजून घेतले पाहिजेत. नाहीतर बेसावध क्षणी बळी जाणे हेच भागधेय होते.

'उसळते जातीय दंगल
जाळते घरांना
मारते बायका—पोरांना'

तरीही आपण गाफील, बेसावध, झोपेत कसे ? हा प्रश्न संवेदनशील कवीमनाला अस्वस्थ करणारा आहे. वर्णव्यवस्थेने जातीपातीच्या भिंती उभ्या करून भेदभाव निर्माण केल्या. उच्च नीचतेच्या कृत्रिम जाळ्यात तो अडकत गेला. त्यातून जातीय दंगली घडत आहेत. याला विराम नाही ही दुःखदायक बाब आहे. विद्रोही, रस्ता सोडून चाललात कुठं ?, आमचा आलेख कोराच हे धांडे यांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. आजच्या उत्तराधुनिक काळात, जागतिकीकरणाच्या काळातही परंपरागत छळवणूक आणि व्यवस्थेकडून खुल्या दिलाने स्वीकारले न जाणे त्यांना अस्वस्थ करते. याच घालमेलीच्या जाणीवेतून आणि भोवतालच्या सामाजिक भानातून शेषराव पिराजी धांडे यांची कविता जन्म घेते.[७]

दलित साहित्याने स्त्री दमनाचा सातत्याने धिक्कार केला आहे. तिच्या नैसर्गिक वाढीसाठी तिला स्वातंर्त्य दिले पाहिजे आणि त्यासाठी तिला शिक्षण दिले पाहिजे म्हणजे तिचे हीत ती बघेल. कुणाला तिच्या हीताचा ठेकेदार होण्याची गरज उरणार नाही. पुरुषसत्ताक व्यवस्थेत मुलगा मुलगी यात मुलीला दुय्यमत्व दिले जाते. मुलीच्या शिक्षणाकडे कानाडोळा केला जातो. पण लहान असलेल्या मुलीला कळत नाही. आणि ती शिकण्याची इच्छा व्यक्त करते. तीला सावित्रीबाई फुले माहित असल्याने तर्कशुद्धरीतीने तिच्या शिक्षणाचे महत्व ती पटवून देत आहे. आईला ती हे सर्व समजून सांगत आहे. तिला शिकून मास्तरीण किंवा नर्स व्हायचे आहे. स्वावलंबी व्हायचे आहे. व्यवस्थेला प्रश्न विचारायचे आहेत. खरे तर हे सर्व प्रश्न उत्तम पवार या कवीने 'मी पण शिकतलय' या कवितेतून विचारले आहेत.

'सारवान धुना ह्याच काम आता करुचय नाय
चार बुका शिकान दुसर्‍याक शाना करुचा हा'

कोकणच्या बोलीने समृद्ध असलेली ही कविता स्त्रियांना, मुलींना आणि माणूस असणार्‍यांना चेतना देणारी आहे. फुले दाम्पत्याने केलेल्या कामानंतर दीडशे वर्षानंतर हा प्रश्न कवितेतून येतो हे आपले सार्वजनिक अपयश आहे. आजच्या जाहिरातीच्या काळात चर्चेत बोथट झालेला पण न सुटलेला हा विषय कवीच्या नजरेतून मात्र सुटत नाही ही समाधानाची बाब आहे. म्हणून जाहिराती, टी. व्ही. सोडून थोडे लक्ष देऊन कविताही वाचल्या पाहिजेत म्हणजे आपल्या संवेदना शाबूत राहतील. 'सत्तेच्या आतबाहेर' हा कवी उत्तम पवार यांचा पहिला कवितासंग्रह त्यांच्यातील विद्रोही कवीची सामाजिक जाण प्रतीत करणारा असा आहे. 'पाने–बेळे' ही त्यांची पोस्टर कविताही प्रसिद्ध आहे.

## संदर्भ

1. Prof- Krishna Barua, IIT Guwahati, Mod&04 Lec&21 Poetry, nptelhrd, https://www-youtube-com/watch\v¾YM6rdgXvemM
2. संदर्भ– en-wikipedia-org/wiki/Poiesis
3. शशिकांत हिंगोणेकर, नवे स्वगत, पाठराखण– भ. मा. परसावळे
4. आनंद विंगकर, आंतरिक सदभावनेचा काव्योद्‌गार, दै. दिव्य मराठी, १३ जानेवारी २०१६, ऑनलाईन आवृत्ती, https://divyamarathi-bhaskar-com/news/anand&wingkar&write&about&marathi&literature &6007915-html
5. आत्मनिष्ठतेची मांडामांड, मटा ऑनलाईन, 29/01/2017, https://maharashtratimes-indiatimes-com/editorial/samwad/poems&by&sheshrao&piraji&dhande/articleshow/56830209-cms